# फलज्योतिष आणि विज्ञान

डॉ. जयंत नारळीकर

सोबत 'धनुर्धारी'ने विचारलेल्या काही प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. तत्पूर्वी पूर्वपीठिका म्हणून मला काही विचार थोडक्यात मांडावेसे वाटतात.

एकवीसाव्या शतकात प्रगतीकडे वाटचाल करताना भारताच्या मार्गात महत्वाचे अडथळे कोणते असे विचारल्यास मी अग्रक्रमाने दोन गोष्टींचा उल्लेख करेन. सर्वात मोठा अडथळा म्हणजे आपली सतत वाढणारी लोकसंख्या. एक अब्जाचा टप्पा आपण गेल्यावर्षी ओलांडला. तसेच १९४७ च्या पूर्वीच्या अखंड भारताची लोकसंख्या आज चीनच्या पुढे गेली आहे ही अस्वस्थ करणारी गोष्ट आहे. जीवनमान उंचावयाचे असेल, दारिद्र्यरेषा पुसून टाकायची असेल तर लोकसंख्येच्या वाढीला आळा घालणे अत्यावश्यक आहे.

त्यापाठोपाठ दुसरा अडथळा म्हणजे अंधश्रद्धेत होणारी वाढ. वाढत्या शिक्षणाबरोबर अंधश्रद्धेत घट होईल असे वाटायचे आजचा तरुण शिक्षित समाज अंधश्रद्ध होताना दिसतो आहे. जर आपण इतर जगापासून अलिप्त असतो तर कदाचित ही अंधश्रद्धा खपूवून घेता आली असती. परंतु जागतिकीकरणाच्या जमान्यात ते शक्य नाहीं आणि आपण जागतिक स्पर्धेत मागे पडणार! कारण अंधश्रद्धांच्या मागे लागून आपण आधुनिक विज्ञानाने सिद्ध केलेली तथ्ये नाकारत आहोत आणि प्रगतीच्या दिशेकडे डोळेझाक करतो आहोत.

**ह्या संदर्भात अलिकडे युवा सकाळ (२५.१०.२००१) मध्ये संध्या जोशी यांचा लेख "कशाला उद्याची बात" वाचनीय आहे. तो मनोरंजक आहे तसा हृदयविदारक ही आहे. "धनुर्धारी"च्या वाचकांनी तो वाचावा.**

*प्रश्न १ : आकाशाशी जडले नाते या आपल्या पुस्तकात पृष्ठ ३० व पृष्ठ ३२२ वर नैसर्गिक उत्पात व रोगराई प्रसाराचा धूमकेतूंशी संबंध नसतो असे लिहिले. पण ४८ वे प्रकरण याच धूमकेंतूशी संबंधित आहे. आपण स्वत: विक्रमसिंघांच्या या तर्काला पुष्टी देणारे संशोधन करून जीवसृष्टी (धूमकेतूंद्वारे) बाहेरून पृथ्वीवर आली असा निष्कर्ष काढला व तशी पत्रकार परिषद घेतली. या दोन विसंगतींवर आपले भाष्य काय?*

*या विषयावर आपण पुढे संशोधन केले त्यासाठी किती मनुष्यबळ व निधी वापरला? वराहमिहीराने बृहतसंहितेत हेच विधान केले. तेव्हा वराहमिहीराची इतर विधाने "वैज्ञानिक" ठरतात ना? नसल्यास का नाही. अशाच स्वरूपाचे संशोधन विद्यापीठातील विज्ञान विभागात होण्यासाठी आपला विरोध का? वैदिक गणितावरही आपण आक्षेप घेतलात असे श्री. दिलीप कुलकर्णी महाराष्ट्र टाईम्स (३०-९-०१) मध्ये लिहितात. आपली प्रतिक्रिया?*

**उत्तर :** धुमकेतूंच्या विधानांमध्ये विसंगती नाही. पूर्वापार चालत आलेल्या समजुतींप्रमाणे आकाशात धूमकेतू दिसणे याचा पृथ्वीवरील उत्पातांशी संबंध जोडण्यात येतो. उदाहरणार्थ एखादी मोठी व्यक्ति स्वर्गवासी होते, पृथ्वीवर ज्वालामुखी, भूकंप, जलप्रलय आदी होतात, रोगराई पसरते असे समजले जाते. ह्याला कोणताही पुष्टिदायक पुरावा नाही. अनेक धूमकेतू येऊन गेले तसेच पृथ्वीवर दरवर्षी उत्पात होतच असतात. पण अमूक अनिष्टाचा संबंध तमुक धुमकेतूशी जोडला पाहिजे असे सांगणारा कुठलाही पुरावा नाही.

हॉएल - विक्रमासिंघा सिध्दांताप्रमाणे रोगजन्तू धूमकेतूच्या शेपटीतून अवकाशात व तेथून पृथ्वीच्या वायुमंडलात उतरतात. तेथून पृथ्वीतलावर पोचायला त्यांना ६ महिने ते वर्षभर इतका अवधी लागू शकतो. त्यानंतर हे रोगजन्तु रोगाची साथ पसरवू शकतील असा हॉएल - विक्रमासिंघांचा सिध्दांत सांगतो. म्हणजे सर्वप्रथम हा सिध्दांत केवळ रोगांच्या साथींचा संबंध धुनकेतूंशी जोडतो - इतर उत्पातांचा किंवा मोठी व्यक्ति मरण्याचा नव्हे. रोगांचा संबंधही तत्काल स्वरूपाचा नाही हे विचारात घेतले पाहिजे. कारण धूमकेतू प्रथम दिसल्यानंतर काही महिन्यांनी सूर्या जवळून जातो. (त्यांतही सर्वच धूमकेतूंच्या शेपटीचे मार्ग पृथ्वीच्या वायुमंडलाला सर्शून जात नाहीत.)

त्यानंतर वर्षाभराने रोगजन्तू साथी पसरवू शकतात. म्हणजे आकाशात धूमकेतू दिसल्यावर साथ पसरायला दीड दोन वर्षे लागणार. दुसरी शक्यता म्हणजे पूर्वी गेलेल्या धूमकेतूच्या मार्गाला पृथ्वीची कक्षा छेदते. अशावेळी धूमकेतूतले जीवाणू पृथ्वीवर येऊ शकतात, हा प्रकार पण धूमकेतू येऊन गेल्यावर अनेक वर्षांनी घडतो. पूर्वीच्या समजुतीत अनिष्ट परिणाम असे उशीराने अपेक्षित नव्हते. थोडक्यात, "धूमकेतु अनिष्टकारक आहे" ह्या पूर्वीच्या समजुतीत आणि हॉएल -विक्रमासिंघा सिध्दांतात तपशिलाचा मोठा फरक आहे, तो ध्यानात घ्यावा.

मी ह्या विषयावर आयोजलेल्या प्रयोगासाठी सुमारे ६० लाख रुपयांचा निधी खर्च झाला. पाच संस्थांतले वैज्ञानिक ह्यात सहभागी आहेत. वराहमिहिराने बृहत्संहितेत नेमके काय विधान केले? अजून आमच्या प्रयोगाचे निष्कर्ष नक्की काय निघणार आहेत ते कळायला अवकाश आहे कारण सँम्पलच्या चाचण्या चालू आहेत. म्हणून 'हेच विधान' म्हणजे काय हे मला तरी आत्ता सांगता येत नाहीं. (हॉएल - विक्रमसिंघा सिध्दांत अजून तपासला जात आहे. तो सिध्द वा सर्वमान्य झाला असे आत्ता म्हणता येणार नाही)

वराहमीहिराचा हा श्लोक मात्र लक्षणीय आहे :-

उदयन्नेव सुभिक्षं चतुरो मासान
करोत्यसौ सार्द्रान् ।
प्रादुर्भाव प्राय: करोति च क्षुद्र
जन्तुनाम् ॥

वाराही बृहत् संहिता, अ.११, श्लोक ४५.

इथे धूमकेतूंतून क्षुद्र जन्तुचा प्रादुर्भाव होतो असे म्हटले आहे. हे जन्तू कुठले? त्यांचा प्रादुर्भाव कसा होतो? ह्या प्रश्नांची उत्तरे व विज्ञानात लागणारा तपशील ह्या सूचक विधानापलिकडे जाऊन आपल्याला मिळत नाहीं. त्या विधानाचा संबंध हॉएल - विक्रमासिंघा सिद्धांताशी जोडायला असेल तर तशी कारणमीमांसा वराहमिहिराच्या लेखनात सापडत नाहीं.

'तेव्हा, वराहमिहिराची इतर विधाने "वैज्ञानिक" ठरतात ना? ह्या प्रश्नाचे तर्कशास्त्र माझ्या आवाक्यापलिकडले आहे. एका व्यक्तीने केलेल्या अनेक विधानपैकी एक विधान वैज्ञानिक असेल तर बाकीची आपोआप (- तपासणी शिवाय) वैज्ञानिक ठरतात हा ग्रह अजब आहे.

"शिक्षणाचे भगवेकरण" हा राजकीय प्रश्न आहे, त्यावर मला भाष्य करायचे नाहीं. वैदिक गणिता वरून सध्या ज्याचा बोलबाल आहे ते मुळात वेदात नव्हते असा तज्ञांनी निर्वाळा दिला आहे. प्रा. दाणी यांचा Economic and Political Weekly (July 31, 1993) मधील इंग्रजी लेख पहा. शिवाय मराठी विज्ञान परिषद पत्रिकेतील October 2001, श्री. प्रकाश बुरटे यांचा मराठी लेख पहा. त्या गणिताचा एकंदर आवाका पहिला तर त्यांत "उच्च गणित" म्हणण्याजोगे काहीच नाहीं हे प्रांजलपणे कबूल करावे लागते. उलट जर ह्या "वैदिक गणिता"च्या आधारे आपण असे विधान करू लागलो "पहा आमचे पूर्वज गणितात किती पुढे गेले होते" तर गणिताच्या आधुनिक विश्वात आपण आपले हसे करवून घेवू.

*प्रश्न २ : आकाशाशी जडले नाते या पुस्तकात आपण बर्नी सिल्व्हरमन यांचे नांवे दोन चाचण्या नोंदविल्या. मिशगन स्टेट युनिव्हर्सिटीत अशी व्यक्ती कधी नव्हती असे पत्र अ‍ॅस्ट्रॉलॉजिकल मॅगझीन (जुलै २००१ पृष्ठ ६०८) मध्ये प्रसिद्ध झाले आहे. त्याबद्दल आपण काही प्रकाश टाकावा.*

**उत्तर :** बर्नी सिल्व्हरमन ही व्यक्ति कोण? ती खरोखर अस्तित्वात होती / आहे का? श्रीमती गायत्री देवी वासुदेव यांनी अपुऱ्या माहितीच्या आधारे माझ्यावर आगपाखड करण्यापूर्वी मला विचारले असतें तर मी त्यांना आवश्यक ती माहिती पुरवली असती, अथवा स्वतंत्रपणे चवकशी करण्यासाठी माहितीचे स्त्रोत सुचवले असते.

बर्नर्ड एल. सिल्व्हरमन यांनी मिशीगन स्टेट युनिव्हर्सिटीत १९६९ साली एम. एस. व १९७१ साली पीच. डी केले. ते त्या विद्यापीठात प्राध्यापक नव्हते. (- ते तेथे प्राध्यापक होते असे मी माझ्या "आकाशाशी जडले नाते" किंवा त्याचे इंग्रजी रूपांतर 'A Cosmic Adventure' मध्ये म्हटले नव्हते याची नोंद घ्यावी.) सिल्व्हरमन हे त्यानंतर संख्याशास्त्र (Statistics) व मार्केटिंग रिसर्च ह्या क्षेत्रात काम करीत होते. काही काळ ते स्टॉक्टन स्टेट कॉलेजमध्ये शिकवत होते, नंतर ग्वेल्फ आणि रुझ्वेल्ट विद्यापीठात होते व सध्या बेनेजिक्टाइन युनिव्हर्सिटीत पार्ट टाइम अध्यापन करतात. १० ऑक्टोबर २००१ ला मला त्यांच्याकडून ई-मेल आली

आहे. तिचे शीर्षक टी. व्ही वरील क्विझ प्रोग्रॅम प्रमाणे आहे : Silverman Please Stand Up? आपल्या अस्तित्वाबद्दल शंका व्यक्त केली जात आहे याबद्दल त्यांना गंमत वाटते.

असो! बर्नी सिल्व्हरमनच्या ज्या संशोधनाचा मी उल्लेख केला आहे. त्यावरील त्यांचे प्रबंध खालील नियतकालिकात पहायला मिळतील.

(१) जर्नल ऑफ सायकॉलॉजी, व्हॉल्यूम ७७(२), पाने १४१-१४९, १९७१

(२) जर्नल ऑफ सायकॉलॉजी, व्हॉल्यूम ८७(१), पाने ८९-९५, १९७४

बर्नी सिल्व्हरमन यांच्या कार्याचे वर्णन जे. पॅसॅचॉफ यांच्या Contemporary Astronomy ह्या पाठ्यपुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत आले होते. अमेरिकन ॲस्ट्रोनॉमिकल सोसायटीच्या मर्क्युरी ह्या नियतकालिकात (नोव्हेंबर/डिसेंबर, पान १३७, १९८०) ते उधृत केले होते. ही सर्व प्रस्थापित नियमकालिके असून त्यांत ही वर्णने स्वतंत्रपणे मिळवून कोणालाही वाचता येतील. आपल्या वाचकांनी ती वाचून योग्य बोध घेतल्यास मला आवडेल.

***प्रश्न ३ : १९८२ साली सर्व ग्रह एका बाजूला आल्यामुळे पृथ्वीवर उत्पात होतील हे भाकित ज्युपिटर इफेक्ट या पुस्तकांत भूगोल तज्ञांनी केले होते ते आपण ज्योतिषांच्या नांवे दिले आहे. मूळ वस्तुस्थिती काय आहे?***

**उत्तर :** १९८२ साली 'ज्युपिटर इफेक्ट'चा बोलबाल झाला होता. परंतु ते बाजूला काढले तरी काहीतरी उत्पात / अनिष्ट घडणार असे आभास त्या काळी वृत्तपात्रात फलज्योतिष सांगणाऱ्यांनी पण निर्माण केले होते.

कृपया ह्या संदर्भात माझा टाइम्स ऑफ इंडियातील २५.१.९९ च्या अंकातला लेख पहावा. ५ मे २०००, १० मार्च १९८२, ५ फेब्रुवारी १९६२ रोजी अनेक ग्रह एका बाजूला आल्यामुळे अनर्थ होणार अशी फलज्योतिषी भाकिते करण्यात आली होती. १९६२ च्या प्रसंगी पं. नेहरूंना तुम्ही विमान प्रवास करू नका म्हणून सल्ला देण्यात आला होता तेव्हा आपला (अशा भाकड भाकितांवर) अविश्वास दर्शविण्यासाठी ते मुद्दाम विमानातून फिरले अशी बातमी त्यावेळी आली होती. वास्तविक ह्या तीनही तारखांना काहीही अनिष्ट घडले नाहीं.

***प्रश्न ४ : प्लॅनेट हा एकत्र ग्रीक शब्द अयोग्य पण 'ग्रह' हा शब्द तसाच अयोग्य ठरतो का? ज्योतिष शास्त्राचा उगम भारतता की ग्रीसमध्ये? स्वत: टॉलेमी ग्रीकांकडे श्रेय घेत नाही. झोडाइका हा शब्द संस्कृतमधून आला असे पाश्चात्य लेखक सुचवतात. 'अहोरात्र' या शब्दातील 'अ' व 'त्र' चा लोप होऊन 'होरा' शब्द तयार झाला. नक्षत्रे २४ म्हणून होरे २४. या होरावरून hour तसेच होरास्कोप असे शब्द तयार झाले. या विधानावर आपला अभिप्राय काय?***

**उत्तर :** 'प्लॅनेट' म्हणजे 'भटके' हा ग्रीक शब्द ग्रहांच्या सकृद्दर्शनी अनियमित वाटणाऱ्या वाटचालीवरून प्रचारात आला. त्यावेळी ग्रीकांना गुरुत्वाकर्षणाचा नियम माहीत नव्हता, म्हणून त्यांना ग्रह आकाशात स्वैराचार केल्याप्रमाणे भटकतात असे वाटले. त्यांच्या त्यावेळच्या आकलनात प्लॅनेट शब्द चुकीचा म्हणता येत नाहीं. पुढे सतराव्या शतकात न्यूटनच्या गुरुस्थाकर्षणाच्या नियमानुसार ग्रह ठराविक कक्षांत फिरतात हे सिद्ध झाले तेव्हा त्यांना 'भटके' म्हणणे योग्य नाहीं असे आढळले.

ज्याला आपण फलज्योतिष म्हणतो - त्यांत प्रामुख्याने ग्रहांचा मानव जीवनावर, मानव स्वभावावर इ. परिणाम गृहीत धरला जातो - तो विषय प्रामुख्याने पाश्चात्य जगातून भारतात आला. वेदकालीन वाङ्मयात शुभदिन, अशुभ वेळ, उत्पातांचा नक्षत्रांशी संबंध आदी कल्पना सापडतात. गर्ग संहितेत 'शकुन शास्त्रा'चे वर्णन आहे. पण त्यांत जन्माच्या वेळी चंद्र कुठल्या नक्षत्रात होता याच्याशी शुभ-अशुभ संबंध जोडला जातो. याला नक्षत्र विद्या म्हणतात.

आजवर ज्ञात असलेला इतिहास असे दर्शवितो की जन्माच्यावेळी पत्रिका बनवण्याची पद्धत ई.पू. दुसऱ्या शतकात ग्रीकांच्या प्रभावाखालील ईजिप्त मध्ये सुरू झाली, आणि ख्रिस्तजन्मानंतर दुसऱ्या शतकात भारतात आली. सन १५० च्या सुमारास उज्जयिनीत पश्चिमी क्षत्रप रुद्रदमन याच्या दरबारात ईजिप्तमध्ये रचलेल्या एक फलज्योतिषी ग्रंथाचे भाषांतर संस्कृतमध्ये केले गेले. भाषांतरकार 'यवनेश्वर' हा तेथील ग्रीक समाजाचा प्रमुख असावा. ह्या भाषांतरात पाश्चात्य

कल्पना आणि नावे यांचे भारतीकरण करण्यात आले. मूळ भाषांतर गद्यात होते ते आज उपलब्ध नसले तरी त्याचे पद्यात रुपांतर (यवन राजा) स्फुजिध्वजाने केलेले उपलब्ध आहे. ते सुमारे २७० सनात पश्चिमी क्षत्रप रुद्रसेन द्वितीयाच्या काळात झाले. स्फुजिध्वजाच्या 'यवन जातक' ह्या ग्रंथात (- डेव्हिड पिंग्री इंग्रजीत भाषांतर केलेले पहावे-) ग्रीक - इजिप्शियन कल्पनांचे हिंदीकरण पहायला मिळते. त्यानंतर मीनराजाचे 'वृद्ध यवन जातक' (सन् ३०० - ३२५) हे मोठे पुस्तक सुद्धा मूळ ग्रीक स्त्रोताचे आहे.

स्फुजिध्वजाच्या लेखनात 'राहू' 'केतू' यांचा उल्लेक नाही, पण मीन राजा हा 'राहू'चा ग्रह म्हणून उल्लेख करतो. वराहमिहिराचा (६ वे शतक) 'बृहत् - जातकम्' हा ग्रंथ भारतीय फलज्योतिषात महत्वाचा मानला जातो. त्याने ग्रीक प्रभावाचा आवर्जून उल्लेक केला आहे. खालील श्लोक पहा:

म्लेच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रमिदं स्थितम्।

ऋषिवत्तेऽपि पूज्यन्ते किं पुनर्दैविद द्विजः ॥ बृह. २ अ. १४

संस्कृत विद्वान् कुन्हन राजा (-Survey of Sanskrit Literature, Bombay 1962) पान २७५-२७७) यांनी पूर्वीच्या ग्रंथांचा सखोल अभ्यास करून ज्याला आपण आज ग्रह स्थितीवर आधारलेले फलज्योतिष म्हणतो ते मुळात वैदिक नसून बाहेरून आल्याचा निर्वाळा दिला आहे. केवळ 'अहोरात्र' सारखे शब्द न पाहता संपूर्ण ग्रंथावली पाहून निर्णय करणे केव्हाही बिनचूक ठरावे.

***प्रश्न ५ :*** *वेदात ज्योतिष हे कालज्ञान शास्त्र म्हटले आहे. ग्रहांमुळे मानवाला काल मोजता येतो. त्या ऐवजी गुरुत्वाकर्षण हा ज्योतिषाचा आधार असे आपण गृहीत कोटून घेतले व गुरुत्वाकर्षण नियमाच्या आधारे फलज्योतिष अवैज्ञानिक असे आपण कसे म्हटले? संस्कृत ग्रंथात गुरुत्वाकर्षणाचा उल्लेख आहे काय?*

**उत्तर :** ह्या प्रश्नात बरेच घोळ आहेत. त्यामुळे तो गुंता उलगडून सांगतो.

वेदांग ज्योतिषात गणित आणि खगोलीय निरीक्षणांच्या आधारे कालमापन पद्धती यांचे विवेचन सापडते. सूर्य आणि चंद्र तथा नक्षत्रे यांच्या पार्श्वभूमीवर कॅलेंडर करण्याचे महत्वाचे काम त्यांत आहे. वेदकालीन समजात यज्ञ यागांना महत्व होते व त्यासाठी अमुक वेळ शुभ, अमुक अशुभ अशा कल्पना होत्या. त्यामुळे आणि शिवाय शेतीचे मौसम ठरवण्यासाठी कालमापन पद्धती बिनचूक असणे गरजेचे होते. परंतु ह्या वैदिक काल-मापन पद्धतीत ग्रहाचा उल्लेख नाहीं हे आवर्जून सांगावेसे वाटते. आर्यभट - वराहमिहिर - भास्कराचार्य आदी वेदकालीन नसून पुष्कळ नंतरचे होते.

ग्रहांचा मानवावर परिणाम होतो त्या मागचा कार्य-कारण भाव कोणता? जर ह्या प्रश्नाचे उत्तर वैज्ञानिक कक्षेत हवे असेल - आणि फलज्योतिष हे विज्ञान आहे असा आग्रह फलज्योतिष्यांकडून धरला जातो - तर विज्ञानाला अभिप्रेत बळांच्या रूपात हे उत्तर शोधले पाहिजे. चार ज्ञात बळांपैकी गुरुत्वाकर्षण हे एकच बळ त्यासाठी विचारणीय ठरते. (खगोल शास्त्रातील घटनांचा अभ्यास करताना हाच निकष वापरला जातो.) फलज्योतिषावर विश्वास ठेरणारे चंद्रामुळे भरती आहोटी येते तशी ग्रहांमुळे मानवी रक्तात येते आणि त्यामुळे मानवावर परिणाम होतो असा दावा करतात. भरती-ओहोटीचे बळ गुरुत्वाकर्षणाचेच आहे फक्त त्याचा मानवी रक्तावर होणारा परिणाम नगण्य आहे.

जर फलज्योतिष समर्थकांना असे म्हणायचे असेल की 'आमचा विषय मुळात विज्ञानाच्या कक्षेतला नाहीच' तर प्रश्नच उतर नाहीं. 'फलज्योतिष हे विज्ञान नव्हेच व त्याला विज्ञानाचे निकष लावण्याचा मूर्खपणा वैज्ञानिकांनी करू नये' असा निष्कर्ष त्यांतून निघतो आणि हा वाद इथेच थांबवता येईल.

पण जर असे म्हणायचे असेल की "फलज्योतिष विज्ञान आहे पण ग्रहाचे मानवावर काम करणारे बळ हे चार ज्ञात बळांपैकी नसून नवे वेगळेच आहे" तर त्या गोष्टीचीही विज्ञानाच्या कक्षेत तपासणी करता येईल.

त्यासाठी मुळात ग्रहांचे मानवांवर परिणाम नेमके कुठल्या रूपात दिसतात, त्यांचे भाकीत कसे केले जाते, भाकीताचा खरेखोटेपणा वैज्ञानिक निकषांद्वारे कसा तपासला जातो याची चवकशी आवश्यक आहे. तशा काही

तपासण्यांचे निष्कर्ष मी माझ्या 'आकाशाशी जडले नाते' पुस्तकाच्या ५० व्या परिच्छेदात दिले आहेत. ते सर्वस्वी नकारार्थी ठरले आहेत.

***प्रश्न ६ : पौर्णिमा व अमावस्या या दिवशी खूनाचे प्रमाण विशेष वाढत नाही तेव्हा चंद्राचा व मानसिक रोगांचा संबंध जोडणे अवैज्ञानिक ठरते असे आपण लिहिले. वेडासाठी पाश्चात्मात ल्युनॅटिक असा शब्द वापरतात. प्लॅनेटप्रमाणे तोही शब्द आता भ्रामक ठरतो. ते असो. पण या पाहण्यात भारतीय ज्योतिषाने वेगळा मुद्दा येतो. पंचांगातले विष्टी करण (चंद्र रवी मधील ४५ अंश व त्या पटीतील कोनीय अंतर) हे अनिष्ट मानतात त्यावेळी शुभ कर्म करीत नाहीत. हे विष्टीकरण पौर्णिमा अमावास्यांप्रमाणेच दर साडेतीन दिवसांनी महिन्यात आठ वेळा येते. तेव्हा पृष्ठ ३३२ वरील आपण उद्धृत चाचण्यांचा तपशील मिळेल का? म्हणजे विष्टी करणाची तपासणी करता येईल.***

*अशा प्रकारची फेरचाचणी मुंबईत घेण्यासाठी आपण एखादे विद्यापीठ, शासन, यांना शिफारस कराल का?*

**उत्तर** : वैज्ञानिक चाचणीत प्रयोग करण्यापूर्वी चाचणीचा तपशील ठरवावा लागतो. त्यामुळे विष्टीकरण किंवा आणखी कुठल्याही फलज्योतिषी भाकीतांची चाचणी करण्यापूर्वी नवे प्रयोग व चाचणीचे तपशील ठरवले पाहिजेत. उदाहरणार्थ बर्नी सिल्व्हरमन ने केले तसे प्रयोग भारतीय पार्श्वभूमीवर करणे आवश्यक ओह. त्यासाठी फलज्योतिषांची तयारी असेल तर मी अंधश्रद्धा निर्मूलन समिती किंवा मराठी विज्ञान परिषदेस पुढाकार घ्यायची विनंती करू शकेन.

***प्रश्न ७ : बार्नम इफेक्ट सारखी मोघम भविष्ये बृहत् जातक, जातक पारिजात इ. मान्य ग्रंथातून आपण उदाहरण म्हणून देऊ शकाल का?***

**उत्तर** : आपण विशिष्ट व्यक्तींचे भविष्य आपल्याला मान्य ग्रंथाद्वारे मांडावे. ते कितपत बार्नमसदृश आहे ते तपासून पाहता येईल. त्यासाठी दहा व्यक्तींची नावे न सांगता केवळ पत्रिका दाखवली जाईल. त्यावरुन आपल्या वरील ग्रंथाद्वारे काय सांगता येते ते पाहूया!

***प्रश्न ८ : जॉ-क्लो पेकेअर यांचे मते मुर्मांस्क या रशियन शहरातील पत्रिका बनवता येत नाही. त्या शहरात तेथील दि. १-१०-२००१ रोजी १० वा. ची पत्रिका बनवता येणार नाही असे विधान एक खगोलज्ञ म्हणून आपण करणार आहात का? तेथे घड्याळे नाहीत का?***

**उत्तर** : पत्रिका बनवायला ग्रह 'दृश्य' आकाशात कुठे आहे याची नोंद लागते. मुर्मान्स्क येथून ग्रहच दिसत नाहीत. ते क्षितिजाखाली कोठे असतील ते गणिताने सांगता येईल पण त्यांचा पत्रिकेसाठी उपयोग नाहीं... कारण पूर्वापार चालत आलेल्या फलज्योतिषी कल्पना जन्मकाळी आकाशात दिसणाऱ्या ग्रहां-राशींबद्दल असतात. जॉ-क्लो पेकेअर यांनी हा विचार मांडला होता.

***प्रश्न ९ : ज्योतिष आणि कुंडली म्हणजे बायोन्हिद्म बायॅलॉजिकल क्लॉक्स असे जर म्हटले तर ते चूक ठरेल का? अशी जैवीक घड्याळे व कॅलेंडरे बनविण्याचे कुंडली व ग्रहचार यापेक्षा दुसरे एकादे सोपे उपकरण आपल्याला माहीत आहे काय?***

**उत्तर** : बायोन्हिदम / बायालॉजिकल क्लॉक हे नुसते शब्द वापरून त्यातून वैज्ञानिक सिद्धांत निर्माण होत नाहीं. आपल्याला त्यातून नक्की काय सांगायचे आहे ते स्पष्ट शब्दात मांडा, मग ते चूक का बरोबर ते सांगता येईल.

***प्रश्न १० : आईन्स्टाइनच्या सापेक्षता सिद्धान्तावर टिपणी लिहिताना स्टीफन हॉकिन्स*** A Brief History of Time ***पुस्तकात (आमच्याकडील प्रत पृष्ठ - ३६) लिहितात.*** Each individual has his own personal measurement of time that depends on where he is and how he is moving. ***जन्म कुंडली हे असे साधन म्हणता येईल का?***

**उत्तर** : आइन्स्टाइनच्या सापेक्षता वादानुसार प्रत्येक निरीक्षकाची त्याची स्वतःची वेळ मोजण्याची पद्धत असते, तिला 'प्रॉपर टाइम' म्हणतात. वेगवेगळ्या वेगाने धावणाऱ्या निरीक्षकांच्या प्रॉपर टाइमना एका विशिष्ट सूत्राने जोडता येते. ह्या प्रॉपर टाइमचा कुंडलीशी काही एक संबंध नाहीं.

**डॉ. जयंत नारळीकर**
१, आकाशगंगा, आयुका कॉलनी,
पोस्ट बॅग क्र. ४,
गणेश खिंड, पुणे - ४११ ००७.

★★★